# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड      जा.क्र. ३९१/२०१९      दिनांक  १२/११/२०१९**

**एम.एस.ई.बी.च्या डी.पी.तोडुन त्यातील तार चोरणारे आरोपी मुद्देमालासह एल.सी.बी.च्या ताब्यात**

मा.पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार मगर साहेब,व अपर पोलीस अधिक्षक श्री दत्ताराम राठोड साहेब यांनी नांदेड शहरातील व परीसरात पाहिजे फरारी आरोपींचा शोध घेऊन आरोपींना अटक करण्याचे आदेश दिले आहेत. त्यावरुन स्थागुशा शाखेचे पोलीस निरीक्षक यांनी पथक नेमुण पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी शहरात व परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना लातुर फाटा भागात गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, पांगरा फायर बट जाणारे रोडवर पाईप लाईनचे वॉलजवळ रोडवर तिन इसम तांब्याचे कॉपर तार पोत्यातभरत असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी छापा मारुन आरोपी नामे 1) किसन पि.गोविंद पुलेवार वय 40 वर्षे व्यवसाय मजुरी रा.पांगरी ता.जि.नांदेड 2) माधव पि.किसन काळे वय 47 वर्षे व्यवसाय मजुरी रा.लोंढे सांगवी ता.लोहा जि.नांदेड 3) रामदास पि.माधवराव घोगरे वय 28 वर्षे व्यवसाय मजुरी रा.असदवन ता.जि.नांदेड हे मिळुन आले त्यांचे जवळ एम.एस.ई.बी.च्या डि.पी.मधिल तांब्या सारखे धातुचे जळालेले कॉपर तार एकुण 52 किलो व एक मोटार सायकल असे एकुण किमत रुपये 33580/-चा माल मिळुन आला सदर माल जप्त करुन सदर आरोपीतांनी अशा प्रकारचे चार गुन्हे केल्याचे कबुल केले असुन सदर गुन्हे पोलीस स्टेशन लिंबगाव हद्दीतील व इतर ठिकाणी केल्याचे सांगत असल्याने सदर आरोपी व जप्त मुद्देमाल पोलीस निरीक्षक पो.स्टे.लिंबगांव यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरचे कार्यवाही केल्याने स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड येथील पोलीस अधीकारी व कर्मचारी यांचे मा. पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधिक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहेत.

पोलीस अधिकक्षक कार्यालय,
नांदेड.